Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – X Issue – I January – February 2021

# भारतावरील परकिय आक्रमणाच्या काळात मालेगांव तालुक्याचा सहभाग

प्रा. डॉ. जी. डी. रूपवते
*इतिहास विभाग प्रमुख*
*दादासाहेब बिडकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पेठ, नाशिक.*

*सारांश :–*

*इ.स. 1962 भारत–चीन इ.स. 1965 आणि 1971 भारत–पाकिस्तान युध्दाच्या प्रसंगी शहरातील सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी एकत्र येवून मालेगांव तालुका नागरिक संरक्षण समितीची स्थापना केली होती. या समितीमध्ये मालेगांवातील सर्व जाती धर्मातील लोकांनी सकिय सहभाग घेतला होता. त्यांनी समितीच्या माध्यमातुन सभा, मिरवणूका, प्रभातफेरी, समरगीत गायन कार्यकमांचे आयोजन करून भारतावरील परकीय आकमणांच्या प्रसंगी जनजागृती करून जनतेत देशप्रेमाची भावना निर्माण केली होती.*

*मालेगांव शहर व परिसरातील जनतेने या तीनही युध्दाच्या प्रसंगी राष्ट्रीयतेच्या भावनेतून देशकाल परिस्थितीचा विचार करून उदार अंतःकरणाने संरक्षण निधीस सढळ हाताने मदत केली होती. संरक्षण समितीत हिंदू–मुस्लिम सर्वच जाती धर्माच्या लोकांनी केलेल्या कार्यातून मातृभूमीच्या प्रेमाची जाणीव होते. तसेच येथील जनतेच्या ठिकाणी असलेली कियाशील व उदात्त देशभक्ती, नम्रकर्तव्य परायणता, मातृभूमीचे ऋण फेडण्याची भावना यांचा झालेला संगम या कार्यातून आपणांस दिसून येते.*

Golbal Oline Electronic International Reserch Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

**प्रस्तावना –**

भारताच्या स्वातंत्र्यानंतर भारतावर परकिय देशांनी युध्दाचा प्रसंग आणला. अशा या संकटाची भारताला संरक्षण निधीची गरज भासली. भारताच्या विविध राज्यातुन, जिल्ह्यातुन, तालुक्यातून आणि खेड्यांमधून उत्स्फूर्तपणे संरक्षणनिधी जमा करण्यासाठी सहभाग घेतात. या संकटसमयी मालेगांव मागे राहिले नाही. राष्ट्रतेजाची भावना मालेगांव शहरवासियांमध्ये होती. मालेगांव शहर व तालुक्यातून जो खारीचा वाटा उचलला, तो सोनेरी क्षण व सोनेरी पान याची इतिहासात नोंद व्हावी यासाठी या विषयाचा शोध मी या ठिकाणी घेतला आहे.

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – X Issue – I January – February 2021

**भारत–चीन 1962 चे युध्द –**

भारत ब्रिटीशांच्या वर्चस्वातुन 15 ऑगस्ट 1947 रोजी मुक्त झाला. त्यानंतर दोन वर्षात 1 ऑक्टोंबर 1949 रोजी चीनमध्ये साम्यवादी पक्षाची स्थापना झाली. त्याला 30 डिसेंबर 1949 रोजी भारताने या नव्या सरकारला मान्यता देवून मैत्रीचे धोरण स्विकारले. इ.स. 1950 नंतर आशिया खंडातील या दोन देशांमध्ये सहकार्याचे वातावरण निर्माण झाले होते. भारताचे पंतप्रधान व चीनचे पंतप्रधन चो–एन–लाय यांनी परस्परांच्या देशांना भेटी दिल्या. या भेटीत हिंदी चिनी भाई–भाई ही घोषण लोकप्रिय झाली होती.

परंतु चीनने पुढील काळात भारत सरकारशी मैत्रीचा देखावा करून दृटप्पी धोरण स्विकारले. इ.स.1957 मध्ये चीनने लडाखमधील 12000 चौरस मैलाचा प्रदेश व्यापून आक्साई चीनी रस्ता बांधला. त्यानंतर 23 जानेवारी 1959 मध्ये तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना चो–एन–लाय यांनी पत्र पाठवून मॅकमोहन रेषा मान्य नसल्याचे म्हटले. मार्च 1959 मध्ये तिबेटचे प्रमुख दलाई लामाला भारताने राजकिय आश्रय दिला. भारताची ही कृती चीनने शत्रुत्वाची मानली. त्यामुळे भारत–चीन संबंध अधिक बिघडत गेले. नंतरच्या काळात 'ऑक्टोंबर, नोव्हेंबर 1959– मध्ये भारतीय सरहद्दीवर सैनिकी हालचाली सुरू केल्या होत्या. त्यास भारताने विरोध केला होता. चीनने 8 सप्टेंबर 1962 रोजी मॅकमोहन रेषा अमान्य करून उत्तरेकडून भारतीय हद्दीत प्रवेश केला. तसेच 13 सप्टेंबर 1962 रोजी चीनने भारताकडे प्रस्ताव पाठवून सरहद्दीवरील सैन्य मागे घ्यावी आणि 15 सप्टेंबर 1962 रोजी पुढील कार्यवाहीसाठी चर्चा करावी असे जाहीर केले, परंतु चर्चा होण्याच्या आतच 20 ऑक्टोंबर 1962 रोजी चीनने लडाख भागात सर्वसामान्य सीमारेषा ओलांडून भारतीय सैन्याच्या सर्व आघाडीवर उखळी तोफा व मशीनगन यांचा मारा सुरू करून युध्दास सुरूवात केली होती.

**मालेगांव तालुका नागरिक संरक्षण समिती :–**

भारत–चीन यांचे युध्द सुरू झाले त्यावेळी भारतीय संरक्षण व्यवस्थेला आर्थिक मदत करण्यासाठी संपूर्ण भारतातून ओघ सुरू झाला. तेव्हा मालेगांव नगरपालिकेच्या सभागृहात 24 ऑक्टोंबर 1962 रोजी भारतावरील आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी संरक्षण निधी जमा करण्यासाठी केशवलाल शहा यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली. नंतर पुन्हा दुसऱ्या दिवशी म्हणजे 25 ऑक्टोंबर 1962 रोजी बैठक घेवून कार्यकारी मंडळाची स्थापना करण्यात आली. या कार्यकारी मंडळाच्या अध्यक्षपदी असलम अ. रज्जाक, चेअरमन– बाळासाहेब राजेबहाद्दुर, खजिनदार– मोतीलाल विरचंद शहा, सरचिटणीस– यादव नारायण जाधव, सदस्य मंडळात – बालकिसन शेठ जाजू, मंगलदास ताराचंद, हरीलाल अस्मर, डॉ. नवलराव शहा,

पुणतांबेकर वकील, सुभद्राभाई मर्चंट यांची निवड करण्यात आली होती.

वरील कार्यकारी मंडळाने 26 ऑक्टोंबर 1962 रोजी मालेगांव शहरातील जनतेला भारतावरील चीनच्या आक्रमणची जाणीव करून देण्यासासठी व संरक्षण निधीस मदतीसाठी आवाहन करण्याकरीता सभा आयोजित केली. त्यानंतर 29 ऑक्टोंबर 1962 रोजी मालेगांव शहरातून संरक्षण निधी जमा करण्याकरिता मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीच्या समारोप प्रसंगी जमलेल्या 10–12 हजार जनसमुदायासमारे सादव नारायण जाधव, हारून अन्सारी आणि भ्ला दलपत पाटील यांची भाषणे झाली होती.

मालेगांव शहरातील माजी सैनिक विश्रांतीगृहाच्या मैदानांवर 31 ऑक्टोंबर 1962 रोजी संरक्षण निधी समितीचे सरचिटणीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीत भारतावरील चिनी आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी गरज पडल्यास माजी सैनिकांना युध्दभूमीवर जाण्याचे आवाहन करण्यात आले होते. तसेच मालेगांव शहरातील सर्व शळा–महाविद्यालयातील विद्यार्थी एकत्र करून 13–14 नोव्हेंबर 1962 रोजी शहरातून मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणुकीत ‘उतुंग आमची उत्तर सिमा इंच–इंच लढवू आवाहन करण्यात आले होते. मालेगांव तालुका नागरिक संरक्षण समितीने वेगवेगळ्या मार्गातूनही संरक्षण निधी जमा करण्याचे जनतेने योग्य तो प्रतिसाद दिला होता. त्यात शहरी भागातील जनतेने 1,13,207 रूपये, ग्रामीण भागातील जनतेने 21,299 रूपये आणि संरक्षण बचत रोखे खरेदीतुन 1,00,370 रूपये अशी एकुण 2,34,976 रूपये संरक्षण निधीस मदत करून राष्ट्र संरक्षणास मदत केली होती.

**भारत–पाकिस्तान 1965 चे युध्द –**

भारत–चीन यांच्यातील सीमावादाला येत असलेले संघर्षाचे स्वरूप पाहून इ.स.1959 मध्ये पाकिस्ताने फायदा घेण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर भारत–पाकिस्तान या दोन्ही राष्ट्रांत डिसेंबर 1962 मध्ये रावळपिंडी, मार्च 1963 मध्ये कलकत्ता आणि मे 1963 मध्ये दिल्ली येथे वाटाघाटी झाल्या. परंतु त्यांना फार काळ यश लाभले नाही. त्यानंतर थोड्याच काळात जानेवारी 1965 पासून सौराष्ट्राच्या सीमेवरील कच्छच्या रणात पाकिस्तानने भारताविरोधी हालचाली सुरू केल्या. तसेच 8 मार्च 1965 रोजी लाहोर येथील भाषणत अब्दुल महिदखान म्हणाले, ‘कश्मिरचा तंटा मिटविण्यासाठी फक्त दोनच मार्ग आहेत, ते म्हणजे काश्मिरी जनतेच्या स्वयंनिर्णयाच्या हक्कास जागतिक लोकमतचा पाठिंबा मिळविणे किंवा काश्मिरी जनतेने भारताविरोधी युध्द सुरू करणे’. त्यानंतर काही महिन्यांतच म्हणजे 1 सप्टेंबर 1965 रोजी पाकिस्तानच्या या आक्रमणला प्रतिउत्तर म्हणून भारताने आघाडी उभारून 6 सप्टेंबर रोजी लाहोर, 7 सप्टेंबर रोजी सियालकोट आणि 8 सप्टेंबर 1965 रोजी सिंध या तीन क्षेत्रांवर प्रतिचढाई केली.

या युध्दात 22 सप्टेंबर 1965 रोजी मालेगांव पासून 5 किलोमीटर अंतरावर असलेल्या दाभाडी गांवातील भारतीय सैन्याचा मराठा इन्फाट्रीट मधील 2749.427 क्रमांकाचा शिपाई निकम दगडु लोटन हा लोहार आघाडीवर लढत असतांना शत्रुंच्या गोळीबारात बळी पडला होता.

**मालेगांव तालुका नागरिक संरक्षण समिती :–**

भारत–पाकिस्तान या युध्दाच्या वेळी मालेगांव शहरातील सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी 13 सप्टेंबर 1965 रोजी नगरपालिकेच्या सभागृहात डॉ. नवलराव शहा यांच्या अध्यक्षतेखली बैठक घेवून मालेगांव तालुका नागरिक संरक्षण समितीच्या कार्यकारी मंडळाची निवड केली. कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष– डॉ. नवलराव शहा, सेक्रेटरी– यादव नारायण जाधव, कार्यकारणीत व्यंकटराव हिरे, हारून अन्सारी, बाळासाहेब राजेबहादुर, मोतीलाल वीरचंद शहा, खालिक बुद्दन सरदार यांची निवड करण्यात आली होती. त्यानंतर मालेगांव तालुक्यातील ग्रामीण भागातून संरक्षण निधी जमा करण्याकरिता गावातील सरपंच यांना आमंत्रित करून तहसिल कार्यालयाच्या आवारात यादव नारायण जाधव यांनी 27 सप्टेंबर 1965 रोजी बैठक घेवून संरक्षण निधी जमा करण्याचे आवाहन केले हाते. तसेच 28 सप्टेंबर 1965 रोजी मालेगांव शहरातील सर्व व्यवहार बंद ठेवून जनजागृतीसाठी मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणुकीचे सभेत रूपांतर झाले त्यावेळी 'अयुब–भुत्तो मुर्दाबाद, हिंदुस्थान झिंदाबाद', 'काश्मिर हमारा है' अशा घोषण देण्यात आल्या होत्या.

नाशिक जिल्हा कलेक्टर कार्यालयातून संरक्षण निधीची पावतीपुस्तके आल्यानंतर 2 ऑक्टोंबर 1965 पासून संरक्षण निधि जमा करण्यास सुरूवात करण्यात आली होती. मालेगांव तालुका नागरिक संरक्षण समितीने केलेल्या आवाहनास जनतेने प्रतिसाद म्हणून मालेगांव शहरातून 56076 रूपये रोख रक्कम दिली होती. मालेगांव तालुक्याच्या ग्रामीण भागातून 23030 रूपये रोख रक्कम आणि बचत रोख खरेदी करून 2,85,500 रूपये संरक्षण निधी समितीकडे जमा केला होता. अशी एकुण 4,23,795 रूपये निधी भारतीय संरक्षण व्यवस्था मजबूत करण्याकरिता नाशिक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांचेकडे जमा करून हातभार लावला होता.

**भारत–पाकिस्तान 1971 युध्द :–**

भारत–पाकिस्तान यांच्यातील इ.स. 1965 च्या युध्द समाप्तीनंतर 10 जानेवारी 1966 रोजी ताश्कंद करार झाला. पाकिस्तानने मात्र या कराराने पालन केले नाही. इ.स.1969–70 च्या दरम्यान चीन, पाकिस्तान, अमेरिका यांची युती निर्माण झाली. पाकिस्तानात डिसेंबर 1970 मध्ये निवडणुका झाल्या. या निवडणुकीत पुर्ण पाकिस्तानातील शेख मुजीब रहेमान यांच्या आवामी लिग पक्षाला बहुमत मिळाले असतांनाही याह्याखान यांनी सत्ता देण्यास भेदपूर्ण धोरण स्विकारले. त्यामुळे पाकिस्तानात यादवी निर्माण झाली. या चळवळीला दडपण्यासाठी पाकिस्तानातच्या केंद्र शासनाने

पडपशाहीच्या मार्गाचा अवलंब केला. त्यावेळी पूर्व पाकिस्तानातून जवळजवळ 1 कोटी निर्वासित भारताकडे आले. त्यांना भारताने मानवीय दृष्टीकोनातून आश्रय दिला. भारताचा शेख मुजीब रहेमान यांना पाठिंबा होता हे सहन न होवून 3 डिसेंबर 1971 रोजी पाकिस्तानाने भारताच्या श्रीनगर, पठाणकोट, अंबाला इत्यादी ठिकाणी बॉम्ब फेकून युध्दाचे रणशिंग फुंकले. त्याच दिवशी रात्री भारताच्या राष्ट्रपतींनी देशभर आणीबाणी जाहीर करून प्रतिचढाई करून शत्रुचा निःपात करण्याचा आदेश दिला.

**मालेगांव तालुका नागरिक संरक्षण समिती:–**

पाकिस्तानने भारतावर आक्रमण केले त्यावेळी भारतीय संरक्षण व्यवस्थेला लावण्यासाठी मालेगांवातील सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी 10 डिसेंबर 1971 रोजी बैठक घेवून नागरिक संरक्षपण समितीची स्थापना केली. या समितीच्या अध्यक्षपदी मुस्तफा कोढर, कार्यकारी अध्यक्ष– यादव नारायण जाधव, सदस्य– खालीफ युद्दन सरदार, डॉ. नवलराव शहा, हारून अन्सारी यांचा समावेश होता. तसेच दि. 12 डिसेंबर 1971 रोजी नागरिक संरक्षण समितीची पुन्हा बैठक झाली. यावेळी या.ना.जाधव आणि डॉ. नवलराय शहा यांची भषणे झाली. या बैठकीस आमंत्रित करण्यात आलेले मालेगांव जमेनुल उलेमाचे अध्यक्ष मौलवी महंमद अस्मान समितीला पाठींबा जाहीर करतांना म्हणाले,'आज पाकिस्तान इस्लामाच्या नावावर लढत आहे, तर मालेगांवातील मुसलमान धर्माच्या नावावर नव्हे तर लोकशाही आणि निधर्मी भारत सरकारचा पाठपुरावा करतील' असे आश्वासन दिले.

मालेगांव तालुका नागरिक संरक्षण समितीने 23 डिसेंबर 1971 रोजी मालेगांव शहरातून प्रभात फेरी काढून पाकिस्तान आक्रमणाची जनतेला जाणीव करून दिली. त्यावेळी मालेगांव शहरातील सर्वसामान्य जनतेने 2 लाख 21 हजार रूपये संरक्षण निधीस मदत केली. तसेच संरक्ष्ज्ञण बचत रोखे यांची खरेदी करून 49000 रूपये आर्थिक मदत केली होती. अशी एकुण 2 लाख 70 हजार रूपये युध्दाप्रसंगी मालेगांव तालुका नागरिक संरक्षण समितीने जमा करून भारतीय संरक्षण व्यवस्थेस हातभार लावला होता.

**संदर्भ–**

1) जोशी लक्ष्मणशस्त्री कर्ततिर्थ (प्रमुख संपा.) मराठी विश्वकोश, खंड 12
महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई. पान नं. 333, 335, 348, 351.

2) दिवान चंद्रशेखर– भारताची विदेशनिती, विद्या प्रकाशन रूईकर पथ, नागपुर, 02, पान नं. 148, 195, 196, 197.

3) देवळाणकर शैलेंद्र– भारतीय परराष्ट्र धोरण सातत्य आणि स्थित्यंतर प्रतिमा प्रकाशन, सदाशिव पेठ पुणे 30, पान नं. 160.

4) नायक श्रीकांत विष्णू– रणांगण 1947 ते कारगिल, स्वामी पब्लिकेशन 106, शनिवारपेठ, पुणे 30, पान नं. 241.

5) बाचल वि.मा.– आंतरराष्ट्रीय संबंध (1919–1975) कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे 30 पान नं. 194, 195, 197, 198, 201.

6) भामरे के. जी. जाधव एमडी. (संपा.)– व्यक्तीविशेष पुस्तिका विश्वभारती मुद्रणालय, मालेगांव, जि, नाशिक पान नं. 15, 26, 99.

7) वाईकर अनंत–आंतरराष्ट्रीय राजकारण, निराली प्रकाश पुणे 2, पान नं. 25, 27.

8) वैद्य सुमन, कोठेकर शांता– स्वतंत्र भारताचा इतिहास (1947–1986) श्री. साईनाथ प्रकाशन, नागपुर 10, पान नं. 247, 274त्र

9) सरदार ग.बा (संपा.) संक्रमण काळाचे आव्हान, जोशी आणि लोखंडे प्रकाशन, टिळक रस्ता पुणे पान नं. 215, 233

10) मालेगांव नगरपालिका प्रोसेडिंग बुक दि. 27 ऑक्टों. 1959

**वृत्तपत्रे–**

**दैनिक**

1. दै. गांवकरी नाशिक जिल्हा आवृत्ती– दि. 14 सप्टेंबर 1965, 29 सप्टेंबर 1965
2. दै. केसरी पुणे जिल्हा आवृत्ती– दि. 1 मार्च, 9 मार्च आणि 12 मार्च 1965

**साप्ताहिक**

1. 'धडपड' मालेगांव तालुका आवृत्ती– दि. 31 ऑक्टोंबर 1962, 9 नोव्हेंबर, 23 नोव्हेंबर, 30 नोव्हेंबर 1962, 7 डिसेंबरर व 21 डिसेंबर 1962, 26 जानेवारी 1963, 8 फेब्रुवारी 1963, 1 ऑक्टोंबर व 8 ऑक्टोंबर 1965, 5 नोव्हेंबर व 12 नोव्हेंबर 1965, 3 डिसेंबर व 9 डिसेंबर 1965, 17 डिसेंबर, 24 डिसेंबर आणि 31 डिसेंबर 1971.

2) 'जागृती' मालेगांव तालुका आवृत्ती– दि. 20 जानेवारी आणि 26 जानेवारी 1963, 5 डिसेंबर 1962, 20 डिसेंबर 1962, 1 ऑक्टोंबर 1965.